२६ हजार मराठी भाषिकांना ऑटोरिक्षाचे परवाने

एसटीतील ११ हजार ९४२ कर्मचाऱ्यांना सेवेत परत घेणार

परिवहनमंत्री दिवाकर रावते यांची घोषणा

राज्यात अडीच लाख ऑटोरिक्षा परवाने देण्याची घोषणा केली. त्यानुसार मराठी भाषिकांना परवाने देण्याची कार्यवाही सुरू केली. पहिल्या टप्प्यात २६ हजार मराठी भाषिकांना ऑटोरिक्षा परवाने देण्यात आले. त्याचबरोबर एसटी महामंडळातील तिकीट गैरव्यवहार प्रकरणातील ११ हजार ९४२ निलंबित कर्मचारी आणि चार हजार गैरहजर प्रकरणातील कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेण्यात येणार असल्याची घोषणा परिवहनमंत्री दिवाकर रावते यांनी विधान परिषदेत केली.

६० टक्के आरक्षण लागू करणार

रिक्षा परवाने देण्यासाठी ५० टक्के आरक्षण महिलांसाठी, ५ टक्के आरक्षण समांतर आणि ५ टक्के हुतात्म्यांच्या वारसांसाठी राहील. ८० टक्के मराठी जनतेसाठी जे महाराष्ट्रात कायम वास्तव्यास आहेत व २० टक्के १५ वर्षे वास्तव्यास असणाऱ्यांसाठी राहील.

एसटी फोडणाऱ्या भागात यापुढे १० टक्के भाडेवाढ?

मुंबई : वेगवेगळ्या आंदोलनात एसटीच्या गाड्या फोडण्याच्या प्रवृत्तीला आळा घालताना झालेले नुकसान भरून काढण्यासाठी त्या भागातल्या एसटीच्या भाड्यात १० टक्के भाडेवाढ करण्याचा विचार सरकार करत आहे, अशी माहिती परिवहन मंत्री दिवाकर रावते यांनी मंगळवारी विधान परिषदेत दिली.

परिवहन विषयावर सत्ताधारी पक्षांकडून मांडण्यात आलेल्या प्रस्तावाच्या उत्तरात त्यांनी ही माहिती दिली. महाराष्ट्रात जन्मलेल्या आणि मराठीत आठवी उत्तीर्ण झालेल्या उमेदवाराला रिक्षाचा परवाना देण्याचा विचार सरकार करत आहे. या धोरणामुळे सध्या महाराष्ट्रीय उमेदवारांना रिक्षा परवाना देण्याचे ६० टक्के असलेले प्रमाण ८० टक्क्यांवर जाईल. उरलेले २० टक्के परवाने महाराष्ट्रात १५ वर्षे अधिवास करणाऱ्या उमेदवारांना मिळतील, असेही ते म्हणाले. रिक्षाचालकांना पांढऱ्या रंगाचा गणवेश देण्यात येणार असून महिला चालकांना आबोली रंगाचा गणवेष देण्यात येणार आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. एसटीला प्रशिक्षित कर्मचारी मिळावेत म्हणून एसटी महामंडळ स्वतःचे अभियांत्रिकी महाविद्यालय काढणार आहे. नवी मुंबईत वाशी येथे हे महाविद्यालय असेल. कर्मचाऱ्यांना तसेच प्रवाशांना अपघातानंतर जास्तीतजास्त पैसा उपलब्ध व्हावा म्हणून विविध स्वरूपाच्या ▶▶ पान ९ वर....

दुष्काळाचा फटका

मुंबई : राज्यातील भीषण दुष्काळाची झळ गावाकडे जाणाऱ्या मुंबईकरांनादेखील बसली आहे. यंदा गावाकडे जाणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणात घटली आहे. याचा थेट फटका एसटी महामंडळाला बसला आहे. गेल्या वर्षीच्या एप्रिल महिन्याच्या तुलनेत एसटीच्या प्रवासी संख्येत तब्बल ४ टक्क्यांनी घट झाली असल्याने महामंडळाचे सुमारे ३० ते ३५ कोटी रुपयांचे उत्पन्न कमी झाले आहे. परीक्षा संपल्यानंतर मुंबईतील चाकरमानी गावाला जातात. प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी एसटी महामंडळाकडून १५ एप्रिल ते १५ जून या कालावधीत जादा बस चालवण्यात येतात. ▶▶ पान ९ वर....

दुष्काळाचा फटका

(पान १ वरून) उन्हाळी सुट्टी आणि लग्नसराईच्या मोसमामुळे एसटी महामंडळाला मोठा आर्थिक फायदा होतो; परंतु यंदा राज्यात दुष्काळाची भीषणता अधिकच तीव्र होऊ लागल्याने चाकरमान्यांनी गावी न जाण्याचा निर्णय घेतल्याचे दिसून येत आहे. एसटी महामंडळातर्फे उन्हाळी सुट्टीसाठी जादा बसेस सोडण्यात येतात. मात्र यंदा चालवण्यात येणाऱ्या ५० टक्के बसेसचे आरक्षण अद्यापही झालेले नाही. दरवर्षी जादा गाड्या सोडल्याचे जाहीर होताच सर्व गाड्या फुल्ल होतात. मात्र यंदा जादा गाड्यांचे आरक्षण करण्याकडेही चाकरमान्यांनी पाठ फिरवली असल्याचे एसटीतील अधिकाऱ्याने सांगितले. महामंडळामार्फत दररोज ५७ लाख किलो मीटर अंतरापर्यंत एसटी बस चालवण्यात येतात. उन्हाळी सुट्टीनिमित्त ६२ लाख किलोमीटर अंतरापर्यंत एसटी बस चालवण्यात येणार आहेत. या जादा बसेसला यंदा कमी प्रतिसाद लाभल्याने एसटी महामंडळाला सुमारे ३० ते ३५ कोटींचा तोटा सहन करावा लागणार आहे. गेल्या वर्षीच्या पहिल्या तीन महिन्यांत एसटीचे प्रवासी भारमान ५५ टक्के होते. ते यंदा ५३.७० टक्क्यांवर पोहचले आहे. तसेच गेल्या वर्षीच्या एप्रिल महिन्याच्या तुलनेत यंदाच्या एप्रिल महिन्यात सुमारे ४ टक्क्यांनी प्रवासी भारमानात घट झालेली आहे. त्यामुळे महामंडळाने प्रवाशांची मागणी असेल, अशाच मार्गावर गाड्या चालवण्याचे ठरवले आहे.